वर्ष- ११ | अंक- ४४ | मुंबई, मंगळवार, १६ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

सरळ चालण्यापेक्षा उलटे चालणे जास्त चांगले

3 → खरे कोण? एक मंत्री की उर्वरित मंत्रिमंडळ?

वाढवण बंदर राज्यातील सर्व प्रमुख ठिकाणशी जोडणार → 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

कल्याणजवळ अदानी ग्रुपच्या सिमेंट प्लांटला स्थानिकांचा विरोध; ग्रामस्थांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले पत्र



मुंबई, मुंबई महानगर क्षेत्रातील कल्याणजवळ असलेल्या मोहोने गावात अदानी ग्रुपच्या अंबुजा सिमेंट लिमिटेडच्या प्रस्तावित सिमेंट ग्राईंडिंग प्लांटला जोरदार विरोध होत आहे. या प्रकल्पाच्या विरोधात ग्रामस्थांनी मुख्य चौकात पोस्टर्स लावून स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पापाठोपाठ अदानी ग्रुपचा हा दुसरा प्रकल्प आहे, ज्याला स्थानिकांकडून तीव्र विरोध होत आहे.

स्थानिकांचा विरोध का?

मोहोने गाव हे दाट लोकवस्तीचे असून, तिथे अनेक इमारतींचे बांधकाम सुरू आहे. अशा ठिकाणी सिमेंट प्लांट उभारल्यास आरोग्यासह हवेच्या शुद्धतेवरही परिणाम होईल, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे.

2020 मध्ये अदानी ग्रुपने नॅशनल रेयॉन कंपनीचे (एनआरसी) अधिग्रहण केले, तेव्हा तिथे जागतिक दजार्चा लॉजिस्टिक्स पार्क उभारला जाईल असे सांगण्यात आले होते. या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले होते. मात्र, लॉजिस्टिक्स पार्कऐवजी सिमेंट ग्राईंडिंग प्लांट उभारला जात असल्यामुळे स्थानिक रहिवासी नाराज झाले आहेत.

मोहोने आणि इतर सुमारे 10 गावांच्या ग्रामस्थांनी 16 सप्टेंबर रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या जनसुनावणीपूर्वीच स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. ग्रामस्थ मंडळ मोहने कोळीवाडाचे अध्यक्ष आणि भाजपचे स्थानिक नेते सुभाष पाटील म्हणाले, हा केवळ पहिला टप्पा आहे. प्लांटमुळे होणारे वायू आणि जलप्रदूषण, वाढणाऱ्या रहदारीमुळे होणारी हानी, तसेच आरोग्याच्या समस्या यांकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

मुख्यमंत्री, मंत्र्यांना पत्रव्यवहार

स्थानिक रहिवाशांनी या प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करून आपले आक्षेप नोंदवले आहेत. यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, मंडळ योग्य प्रक्रिया पाळत असून ज्यांना आक्षेप आहेत, ते जनसुनावणीमध्ये आपली मते मांडू शकतात.

प्रस्तावानुसार, एकूण 26.13 हेक्टर जागेवर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. यापैकी 9.67 हेक्टर जागा ग्रीन बेल्टसाठी राखीव असून 5.49 हेक्टर जागेवर ग्राईंडिंग युनिट, स्टोरेज आणि पॅकिंग प्लांटची उभारणी केली जाईल.

10 किलोमीटरच्या अभ्यास क्षेत्रात कल्याण तालुक्यातील 38 गावे, भिवंडी आणि अंबरनाथ तालुक्यांमधील गावे येतात, जिथे सुमारे 14,82,478 लोकसंख्या आहे.

सायबर पोलिसांची मोठी कामगिरी: फसवणूक झालेली ₹९६,०००/- रक्कम तक्रारदारास परत मिळवून दिली!



मिरा-भाईंदर। काशीगाव (मिरा-भाईंदर, वसई-विरार) : सायबर पोलिसांनी सतर्कतेने व तातडीने कारवाई करत एका महिलेची ऑनलाईन फसवणूक झालेली ₹९६,०००/- रक्कम बँकेत थांबवून तिला परत मिळवून देण्यात यश मिळवले आहे. तक्रारदार श्रीमती घाडगे यांना एका अनोळखी इसमाने फोन करून, त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने रक्कम पाठविल्याचा बनावट संदेश मोबाईलवर पाठवला. यानंतर अधिक रक्कम ट्रान्सफर झाल्याचे भासवून उर्वरित रक्कम परत पाठवण्यास सांगण्यात आले. विश्वास ठेवून, कोणतीही खात्री न करता तक्रारदारांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर पैसे ट्रान्सफर केले. नंतर बँक खात्यात काहीच रक्कम जमा न झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

तक्रार सायबर क्राईम पोर्टल (NCCRP Portal) वर 31904250063678 या क्रमांकावर नोंदवण्यात आली. पोलिसांनी संशयिताचे बँक खाते त्वरित फ्रीझ करून रक्कम थांबवली. त्यानंतर तक्रारदारांना न्यायालयात अर्ज करण्यास सांगण्यात आले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार रक्कम तक्रारदाराच्या मूळ खात्यात परत करण्यात आली. तक्रारदाराच्या पतींना प्रतिकात्मक चेक देऊन माहिती देण्यात आली.

फसवणूक टाळण्यासाठी सायबर पोलिसांकडून महत्वाच्या सूचनाः

- अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या फोनवर आर्थिक माहिती देऊ नका.
- कोणताही संदिग्ध SMS/लिंक उघडण्यापूर्वी पडताळणी करा.
- बँकेसंबंधी माहिती मिळवण्यासाठी थेट बँकेत जावं, फोनवर माहिती देऊ नये.
- कोणतेही ॲप डाऊनलोड करताना ते अधिकृत आणि सुरक्षित आहे का, हे तपासा.
- फसवणूक झाल्यास तात्काळ 1930/1945 या हेल्पलाईनवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या वेबसाईटवर तक्रार दाखल करावी.

सदरची कामगिरी श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि /स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळ्कर, पोउनि / वैभव धनवडे, मपोहवा/ माधुरी धिडे, मपोअं/ सुवर्णा माळी, मपोअं/ स्नेहल पुणे, पोअं/ राहुल बन, मसुब राजेश भरकडे सर्व नेम- सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांकः १९३०/१९४५

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट www.cybercrime.gov.in

एकतर्फी प्रेमातून तरुणीला संपवलं, 10 महिने आशिक फरार; पण त्या गोष्टीनं प्रकरणाचा उलगडा

ठाणे : एकतर्फी प्रेमातून ठाण्यात भयंकर घटनेचा उलगडा झाला आहे. शेजारी राहणाऱ्या तरुणीने प्रेमसंबंधास नकार दिल्याच्या रागातून २४ वर्षीय तरुणाने २३ वर्षीय तरुणीची भाजी कापण्याच्या सुऱ्याने तिच्या राहत्या घरातच १० महिन्यांपूर्वी गळा चिरून निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणाचा आता एका टॅटूमुळे पदार्फाश झाला आहे.खळबळजनक बाब म्हणजे मोठ्या बहिणीला वाचवण्यासाठी गेलेल्या लहान बहिणीलाही सुऱ्याने वार करून गंभीर जखमी केले होते. ही घटना भिवंडी शहरातील भादवड गावातील कानिफनाथ मंदिराजवळील कृष्णानगरमधील शत्रुघ्न तरे चाळीत घडली होती. हत्या करून फरार आरोपीच्या हातावरील टॅटूमूळे १० महिन्यांनंतर इंदूरमधून अटक करण्यात शांतीनगर पोलिस पथकाला यश आले. अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे. नितु भान सिंग (२३ वर्षे) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. तर राजू महेंद्र सिंग (२४) असे हत्या करणाऱ्या आरोपी तरुणाचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी राजू हा मूळचा उत्तर प्रदेशातील असून मयत तरुणीही मूळची उत्तर प्रदेशातील भदोई जिल्ह्यातील ग्राम नेवादा (दुरस्ता) या एकाच गावातील रहिवाशी होते. कुटुंबासोबत मृतक व आरोपी हे दोघेही भिवंडी शहरातील भादवड गावातील कृष्णानगर मधील भरत तरे यांच्या चाळीतील शेजारी शेजारी भाड्याच्या खोलीत राहत होते. त्यामुळे एकमेकांना ओळख असूनही मृत तरुणीने शेजाऱ्याला प्रेमसंबंधास नकार दिला होता. याच रागातून २८ ऑक्टोबरला रात्री सव्वा अकरा वाजताच्या सुमारास आरोपी राजूने मयत नितु घरी एकटी असताना भाजी कापण्याच्या सुऱ्याने नितुच्या शरीरावर सपासप वार करून तिची निर्घृण हत्या केली होती. त्यानंतर तो फरार झाला होता. तर दुसरीकडे मयत नितुची लहान बहिण रितूने नितुला वाचवण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने रीतुच्या बोटाजवळ सुऱ्याने वार करून तिलाही गंभीर जखमी केले होते.

याप्रकरणी मयत नितुच्या वडिलांच्या फियार्दीवरून भान्यासं कलम १०३, ३३३, ११८ (१) सह मपोकाक ३७ (१),१३५ न्वये राजूच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर पोलिसांची कुणकुण लागताच राजू घटना स्थळावरून फरार झाला होता.

तेव्हापासून पोलिस त्याचा सीसीटिव्हीच्या आधारे कसून शोध घेत होती. पोलीस त्याचा सतत शोध घेत होते, परंतु तो त्याचा मोबाईल फोन बंद करून आणि वारंवार त्याचे ठिकाण बदलून पळून जात होता. कधी तो उत्तर प्रदेशातील वेगवेगळ्या भागात तर कधी मध्य प्रदेशात लपून पोलिसांची दिशाभूल करत होता. अखेर शांतीनगर पोलिसांना माहिती मिळाली की आरोपी इंदूरच्या देवास नाका परिसरात लपला आहे. माहितीची खात्री पटताच, पोलिस पथकाने इंदूर गुन्हे शाखेशी संपर्क साधला आणि संयुक्त कारवाई केली. आरोपीने स्वतःला सूरज असे सांगून पोलिसांना फसवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या हातावरील टॅटूने त्याची ओळख पटवली आणि हत्येचे रहस्य उलगडले. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

आरोपीला ताबडतोब भिवंडी येथे आणण्यात आले आणि न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या कारवाईत डीसीपी शशिकांत बोराटे, एसीपी सचिन सांगळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड, पोलिस निरीक्षक अतुल आडुकर आणि विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय सुरेश चोपडे, पोलिस हवालदार रिजवान सय्यद, राजेश पाटील, नीलेश महाले यांच्यासह पोलिस पथक सहभागी होते.


गुजरामधून अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाची सुटका



बदलापूर । गुजरात मधून अपहरण झालेल्या वांगणी येथील एका अल्पवयीन मुलाची सुखरूप सुटका गुजरात पोलिसांच्या मदतीने कुळगाव ग्रामीण पोलिसांनी केली आहे . तसेच अपहरण केलेल्या गुजरात मधील तिन्ही आरोपींना अटक केल्याची माहिती कुळगाव ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी दिली असून पोलिसांच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या पूर्वी डोंबिवलीत वास्तव्यास असणारा हा अल्पवयीन मुलगा वांगणीत वास्तव्यास होता. तो १ सप्टेंबर रोजी गणपती दर्शनसाठी गुजरातमध्ये गेला होता. त्यावेळी अहमदाबाद येथे तीन जणांनी त्याचे अपहरण करून त्याच्या आईकडे १२ लाख रूपयांची मागणी केली असल्याचे मुलाच्या आईने पोलिसांना सांगून पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्या नुसार पोलिसांनी तपासाची चक्र फिरवून मोबाईल सीडीआरच्या आधारे पोलिसांची एक टीम गुजरातच्या दिशेने रवाना केली. दरम्यान पोलीस आपल्या मागावर आहेत अशी कुणकुण त्या अपहरण कर्त्यांना लागली होती. त्यामुळे ते एका खेडेगावात लपून बसले होते. तसेच या अल्पवयीन मुलाला त्यांनी मध्येच सोडले होते. कुळगाव पोलिसांनी गुजरात पोलिसांच्या मदतीने मोठ्या शिताफीने अनिलभाई खेर, लक्ष्मणभाई खेर आणि नरेशभाई खेर या तीनही आरोपींना ताब्यात घेतले. मात्र या अल्पवयीन मुलाने सुटका झाल्यानंतर मोबाईल बंद ठेवल्याने पोलीस तपासात अडचणी येत होत्या. तो अधून मधून मोबाईल सुरूही करत होता. त्या नुसार पोलिसांनी आयएमईआय नंबरवरून अथक प्रयत्न करून या अल्पवयीन मुलाचा शोध लावला. कुळगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक यशवंत कदम, पोलीस हवालदार अनंत पाटील, परमार , श्रीराम पाटील , कनोजे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

दिल्ली व मुंबई हायकोर्टाला बॉम्बधमकी ! न्यायालयांचे काम ठप्प



मुंबई । देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईतील उच्च न्यायालयांना आज आलेल्या बॉम्बस्फोटाच्या धमकीने संपूर्ण देशात खळबळ उडवली. देशातील न्यायव्यवस्थेच्या केंद्रबिंदूंना मिळालेल्या या धमक्या अत्यंत गंभीर असल्याने न्यायालयीन कामकाज ठप्प झाले होते. न्यायालयांचे परिसर रिकामा करण्यात आला. सुरक्षा यंत्रणांनी तातडीने शोधमोहीम राबवत तपास केला. या प्रकाराची गंभीर दखल घेत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दोन्ही उच्च न्यायालयातील बॉम्ब धमकी प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागवला आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळी ९ वाजताच्या सुमारास ई-मेल प्राप्त झाला.यामध्ये मजकूर जोता की,आजच्या दिल्ली उच्च न्यायालयातील स्फोटाने पूर्वीच्या धमक्यांवरील शंका दूर होतील. दुपारी २ वाजेपर्यंत परिसर रिकामा करावा.१९९८ च्या पाटणा बॉम्ब स्फोटांची पुनरावृत्ती होणार आहे. दुपारी नमाजानंतर न्यायाधीशांच्या चेंबरमध्ये हा स्फोट होईल.त्यानंतर सर्व खंडपीठांनी सुनावण्या थांबवल्या आणि न्यायालय रिकामे केले.

बॉम्ब शोध व निकामी करणारे पथक घटनास्थळी दाखल झाले .त्यांनी संपूर्ण परिसर बंदिस्त करून तपासणी केली. या तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. त्यानंतर दुपारी मुंबई उच्च न्यायालयालाही बॉम्ब धमकीचा ई-मेल मिळाला. त्यानंतर न्यायालयीन सुनावण्या थांबवून मुख्य न्यायाधीश चंद्रशेखरांसह न्यायाधीशांकडून न्यायलय परिसर रिक्त करण्यात आला. त्याचबरोबर वकील, कर्मचारी व न्यायालयीन परिसरातील लोकांना परिसरातून तात्काळ बाहेर जाण्याच्या सूचना दिल्या होत्या.मुंबई पोलिसांनी सांगितले की, न्यायालय परिसरात कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही. धमकी खोटी असल्याचे निश्चित झाले आहे. तर न्यायालयीन परिसरात प्रवेश पुन्हा सुरु केला आहे.

एलफिन्स्टन पूल पाडू देणार नाही ! स्थानिक रहिवाशांचा विरोध कायम



मुंबई । शिवडी-वरळी उन्नत मार्गामधील एलफिन्स्टन पूल आज मध्यरात्री वाहतुकीसाठी बंद केला जाणार असे जाहीर केलेले असताना या पुलाच्या पाडकामाला स्थानिक रहिवाशांचा विरोध आजही कायम राहिला. एलफिन्स्टन पुलाचे पाडकाम आणि पुनर्बांधणीच्या कामामुळे परिसरातील १९ इमारती प्रभावित होणार आहेत . या इमारतींचा पुनर्विकास केला जाईल याची लेखी हमी दिल्याशिवाय पूल पाडू देणार नाही,अशी ठाम भूमिका स्थानिक भाजपा आमदार कालिदास कोळंबकर यांनी आज मांडली. या उन्नत मार्ग प्रकल्पामुळे सुरुवातीला एलफिन्स्टन पूल परिसरातील १९ इमारती बाधित होणार होत्या. मात्र एमएमआरडीने प्रकल्पाच्या आरेखनात केलेल्या फेरबदलांमुळे केवळ लक्ष्मी निवास आणि हाजी नुरानी चाळ या दोन इमारतीच बाधित होणार आहेत. या दोन इमारतींमधील मिळून ८३ रहिवाशांना त्याच परिसरातील म्हाडाच्या इमारतींमध्ये सदनिका देण्यात येणार आहेत. त्यासाठी ३०० चौरस फूटपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या घरमालकांना ३०० चौ.फू. अधिक ३५ टक्के अतिरिक्त क्षेत्र मिळून ४०५ चौ.फु.क्षेत्रफलाची सदनिका तर ३०० ते १२९२ चौ.फु. क्षेत्रफळ असलेल्या घरमालकांना सध्याच्या क्षेत्रफळावर अतिरिक्त ३५ टक्के क्षेत्रफळ असे निकष निश्चित करण्यात आले आहेत असे म्हाडाने सांगितले. उपमुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी या ८३ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन त्याच परिसरात करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. मात्र या दोन इमारतींसह परिसरातील १७ इमारतीतील स्थानिक रहिवाशांचा पुलाच्या पाडकामाला विरोध आहे. या प्रकल्पात आरेखन बदलण्यात आल्याने फक्त लक्ष्मी निवास आणि हाजी नुरानी चाळ या दोन इमारती पाडण्यात येणार असल्या तरी एकूणच या संपूर्ण प्रकल्पाच्या कामांमुळे परिसरातील १७ इमारतींना धोका निर्माण होणार आहे. पुलाचे पाडकाम आणि पुनर्बांधणीसाठी करण्यात येणाऱ्या खोदकामामुळे या इमारती खिळखिळ्या होण्याचा धोका आहे. त्यामुळे या इमारतींचा पुनर्विकास करून त्या रहिवाशांना ६२० चौरस फुटाची सदनिका देण्याचे लेखी आश्वासन सरकारने द्यावे आणि त्यानंतरच एलफिन्स्टन पुलाचे पाडकाम हाती घ्यावे,अशी भूमिका कोळंबकर यांनी मांडली.त्यामुळे गेले अनेक महिने रखडलेले एलफिन्स्टन पूल पाडण्याचे काम आणखी लांबण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांसाठी आरक्षण जाहीर

मुंबई । राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांच्या आरक्षणाची घोषणा ग्रामविकास विभागाने केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू असतानाच हा निर्णय जाहीर झाला असून, लवकरच निवडणुकीची तारीख घोषित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या दोन अडीच वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या निवडणुका रखडल्या होत्या. आरक्षणाचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेत होता. हायकोर्टाच्या निर्णयानंतर प्रक्रियेला वेग आला आणि अखेर आरक्षणाची अंतिम यादी प्रसिद्ध झाली. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक नवी दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसी अँड इलेक्टोरल मॅनेजमेंट येथे पार पडली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू व डॉ. विवेक जोशी उपस्थित होते. आरक्षण काढताना २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरली गेली.

वर्धा , नंदूरबार, पालघर, परभणी अनुसूचित जातीसाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी चंद्रपूर, वाशिम, अकोला, हिंगोली, बीड, अहिल्यानगर येथे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

रायगड , सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलडाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर ठाणे (ठँल्ली), कोल्हापूर, सांगली, घाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवगार्साठी आरक्षण जाहीर झाले आहे. सोलापूर , हिंगोली, नागपूर, भंडारा या ठिकाणी पुरुष मागस प्रवगार्साठी आरक्षण तर रत्नागिरी , धुळे, सातारा, जालना, नांदेड या ठिकाणी महिला मागस प्रवगार्साठी आरक्षण असणार आहे.

उड्डाणानंतर विमानाचे चाकच धावपट्टीवर पडले



मुंबई । गुजरातमधील कांडला येथून मुंबईला येणाऱ्या स्पाइसजेटच्या d400 विमानाचे बाहेरील चाक उड्डाणानंतर लगेचच धावपट्टीवर निखळून पडले. त्यामुळे हे विमान मुंबईत उतरताना पायलटने आपत्कालीन स्थिती जाहीर केली होती, मात्र सुदैवाने अनर्थ टळला आणि विमान सुरक्षितपणे मुंबईच्या धावपट्टीवर उतरले. झाले असे की, स्पाइसजेटच्या बॉम्बार्डियर DHC8-400 या विमानाने, ज्याचा उड्डाण क्रमांक SG-2906 होता, शुक्रवारी दुपारी २.३९ वाजता कांडला विमानतळाच्या धावपट्टी क्रमांक २३ वरून उड्डाण केले. उड्डाणानंतर लगेचच टॉवर कंट्रोलरला धावपट्टीवर विमानातून एक मोठी काळी वस्तू पडताना दिसली. दरम्यान तपासणी पथकाने जाऊन पाहिले तेव्हा तिथे विमानाचे चाक पडलेले त्यांना आढळले. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (CSMIA) दुपारी १५:५१ वाजता तांत्रिक बिघाडाची नोंद झाल्यानंतर विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. खबरदारी म्हणून विमानतळ प्रशासनाने संपूर्ण आणीबाणी जाहीर केली होती. तथापि, विमान धावपट्टी क्रमांक २७ वर सुरक्षितपणे उतरले. विमानात क्रूसह सुमारे ७८ प्रवासी होते. ते सर्व सुरक्षित आहेत. लँडिंगनंतर विमानतळावर सामान्य कामकाज पूर्ववत करण्यात आले. बॉम्बार्डियर DHC8-400 मध्ये एक ट्रायसायकल लँडिंग गियर सिस्टम आहे, ज्याच्या नोज गियरवर दोन चाके आहेत आणि प्रत्येक मुख्य लँडिंग गियरवर दोन मुख्य चाके आहेत. स्पाइसजेटच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे की, '१२ सप्टेंबर रोजी कांडलाहून मुंबईला जाणाऱ्या स्पाइसजेट d400 विमानाचे बाहेरील चाक टेकऑफनंतर धावपट्टीवर निखळून पडले. मात्र, विमानाने मुंबईकडे प्रवास सुरू ठेवला आणि विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. लँडिंगनंतर, विमान टर्मिनलवर पोहोचले आणि सर्व प्रवासी सुखरूप उतरले.

आरोग्य



सरळ चालण्यापेक्षा 'उलटे चालणे' जास्त चांगले

सहसा लोक फिट राहण्यासाठी वेगाने चालतात किंवा धावतात, पण तुम्हाला माहिती आहे का की सरळ चालण्यापेक्षा उलट चालणे शरीरासाठी जास्त फायदेशीर ठरू शकते. यामुळे तुमचे स्नायू मजबूत होतात. संशोधनातून असे दिसून आले आहे की, उलटे चालल्याने बॅलेन्स, फोकस आणि फिटनेसमध्ये सुधारणा होते. उलटे चालण्याचे जबरदस्त फायदे जाणून घेऊया, जे तुमचे आरोग्य सुधारू शकतात.

स्नायू बळकट होतात

उलटे चालल्याने त्या स्नायूंवर काम केले जाते जे सरळ चालताना कमी सक्रिय असतात. विशेषतः मांड्या, गुडघे याचे स्नायू बळकट होतात. हे पायांची ताकद वाढवण्यास आणि दुखापत होण्याता धोका कमी करण्यास मदत करतात.

मणक्यावरील ताण कमी होतो

उलटे चालल्याने पाठीच्या कण्यावरील आणि मणक्यावरील ताण कमी होतो. शरीराची स्थिती सुधारते आणि पाठदुखी कमी करण्यास उपयुक्त ठरते.

गुडघ्यासाठी फायदेशीर

गुडघेदुखी किंवा संधिवात यासारख्या समस्यांनी ग्रस्त असलेल्यांसाठी उलटे चालणे हे वरदानापेक्षा कमी नाही. यामुळे गुडघ्यांवरील दाब कमी होतो आणि सांधे लवचिक होतात.

मेंदूला चालना

उलटे चालल्याने तुमच्या मेंदूला नवीन आव्हान मिळते. हे मेंदू-समन्वय आणि संतुलन सुधारते. संशोधनातून असे दिसून आले आहे की उलटे चालल्याने स्मरणशक्ती आणि लक्ष केंद्रित होते.

वजन कमी होण्यास मदत

सरळ चालण्यापेक्षा उलटे चालण्यात जास्त ऊर्जा लागते. यामुळे जास्त कॅलरीज बर्न होतात आणि वजन कमी होण्यास मदत होते.

हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी

उलटे चालल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाच्या स्नायूंना बळकटी मिळते. यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

फक्त १ मिनिट करा ताडासन, तासंतास व्यायाम न करताही व्हाल फिट

बऱ्याचदा असं होतं की आपल्याला व्यायाम करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे इच्छा असूनही व्यायाम करता येत नाही. किंवा काही लोक असे असतात ज्यांना तासनतास व्यायाम करण्याचा खूप कंटाळा येतो. अशा लोकांसाठी एक मिनिटाचे ताडासन करणे खूप फायदेशीर ठरू शकते. काही व्यायाम बराच वेळ करावे लागतात. पण त्याऐवजी १ मिनिटाचे ताडासन केले तरी ते बरेचसे शारिरीक त्रास कमी करण्यासाठी पुरेसे ठरते. ताडासन कसे करायचे आणि त्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात ते पाहूया..

ताडासन कसे करायचे?

ताडासन करण्यासाठी सगळ्यात आधी जमिनीवर योगा मॅट किंवा सतरंजी टाकून ताठ उभे राहा.

त्यानंतर तुमचे दोन्ही हात एकमेकांत बांधा आणि ते वर एका सरळ रेषेत घ्या.

आता दिर्घ श्वास घेत पायाचे घोटे उचला खांदे मागच्या बाजुने ओढल्यासारखे करा आणि शरीराचा सगळा भार पायाच्या बोटांवर घ्या.

नजर तुमच्या समोर असणाऱ्या एखाद्या वस्तूवर स्थिर करा आणि ही आसनस्थिती ५० ते ६० सेकंद टिकविण्याचा प्रयत्न करा. अशा पद्धतीने तुम्ही २ ते ३ वेळाही ताडासन करू शकता.

ताडासन केल्याने काय फायदे होतात?

अभ्यासानुसार पाठीच्या कण्यासाठी आणि बॉडी पोश्चर सुधारण्यासाठी ताडासन करणे फायदेशीर ठरते.

गुडघे आणि पायाचे घोटे मजबूत होण्यासाठी ताडासन करणे उपयुक्त ठरते. गुडघे दुखत असतील तर नियमितपणे ताडासन करावे.

काही जणींच्या नेहमीच पोटऱ्या दुखतात, ओढल्यासारख्या होतात. हा त्रास कमी करण्यासाठी ताडासन करावे.

एकाग्रता वाढण्यासाठीही ताडासन उपयुक्त ठरते. त्यामुळे मुलांनाही ते करायला लावावे.

ताडासन नियमितपणे केल्यास मुलांची उंचीसुद्धा वाढते.

सकाळी झोपेतून उठल्यावर थकवा- आळस जाणवतो? घ्या 'या' टिप्स, दिवसभर राहाल फ्रेश!



आजकाल लोक इतके बिझी झाले आहेत की, स्वत:ची काळजी घेण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. याचा थेट प्रभाव मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर पडतो. वेळ मिळत नसल्याने एक्सरसाईज केली जात नाही. लोक जंक आणि फास्ट फूड जास्त खात आहेत. ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमजोर होत आहे. अनेकांना सकाळी झोपेतून उठल्यावरही शरीरात अस्वस्थता, कमजोरी, थकवा आणि आळस जाणवतो. अशात सकाळी या समस्या जाणवू नये म्हणून आम्ही काही टिप्स सांगत आहोत.

थकवा आणि स्ट्रेस दूर करण्याच्या टिप्स

१) मेडिटेशन

मानसिक शांतता मिळवण्यासाठी सकाळी उठून मेडिटेशन केलं पाहिजे. सकाळी झोपेतून उठल्यावरही थकवा आणि सुस्ती राहण्याची कारण रात्री व्यवस्थित झोप न येणं आणि मानसिक तणाव असू शकतात. ही समस्या दूर करण्यासाठी मेडिटेशन एक चांगला पर्याय आहे. मोकळ्या हवेत डोकं फ्रेश करण्यासाठी २० ते २५ मिनिटं मेडिटेशन करा.

२) स्ट्रेचिंग एक्सरसाईज

सकाळी झोपेतून उठल्यावर अनेकदा कमजोरी किंवा थकव्यामुळे शरीरात आखडलेपणा येतो. हे टाळण्यासाठी सकाळी स्ट्रेचिंग एक्सरसाईज करू शकता. स्ट्रेचिंग एक्सरसाईज केल्यानं शरीरातील मांसपेशी मोकळ्या होतात आणि शरीराला आराम मिळतो.

३) तेलानं करा बॉडी मसाज

थकवा दूर करण्यासाठी कोमट तेलांनं मालिश करणं हा एक फार जुना उपाय आहे. तेलानं मालिश केल्यानं मांसपेशींना आराम मिळतो. मालिश केल्यावर शरीर ॲक्टिव राहतं आणि थकवा दूर होतो. तेलानं शरीराची मालिश केल्यावर मानसिक तणावही दूर होतो.

४) कोमट पाण्यानं आंघोळ

शरीराचा थकवा दूर करण्यासाठी गरम पाणी खूप फायदेशीर ठरतं. शरीर रिलॅक्स करण्यासाठी आणि ॲक्टिव राहण्यासाठी गरम पाण्यानं आंघोळ करा. याला हीट थेरपी म्हटलं जातं. गरम पाण्यानं आंघोळ केल्यानं सुस्ती आणि थकवा लगेच दूर होतो.

तुम्हीही कागदी कपमध्ये चहा किंवा कॉफी पिता का? त्याचे दुष्परिणाम जाणून घ्या



आजकाल सर्वत्र पेपर कपचा वापर वाढत आहे. हे कप चहा, कॉफी किंवा इतर पेये घेण्यासाठी खूप सोयीस्कर आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का कागदाच्या कपमध्ये चहा किंवा कॉफी पिणे तुमच्या आरोग्यासाठी किती धोकादायक असू शकते?

कागदी कपमध्ये लपलेला धोका:

१. रसायने: पेपर कप बनवण्यासाठी अनेक रसायने वापरली जातात, जसे की फॉर्मल्डिहाइड, डायऑक्सिन्स आणि पॉलीक्लोरिनेटेड बायफेनिल्स (पीसीबी). ही रसायने गरम पेयांच्या संपर्कात आल्यावर पाण्यात विरघळू शकतात आणि आपल्या शरीरात प्रवेश करू शकतात.

२. एक्सट्रुडेड पॉलिस्टीरिन: काही पेपर कपमध्ये एक्सट्रुडेड पॉलिस्टीरिन (EPS) चे अस्तर असते, जे एक प्रकारचे प्लास्टिक आहे. गरम पेयांच्या संपर्कात आल्यावर EPS हानिकारक रसायने सोडू शकते, जी आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.

३. हार्मोन्स: पेपर कपमध्ये वापरले जाणारे काही रसायने हार्मोन्सच्या पातळीवर परिणाम करू शकतात, ज्यामुळे प्रजनन क्षमता, थायरॉईड ग्रंथी आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

४. कर्करोगाचा धोका: काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की पेपर कपमध्ये वापरल्या जाणाऱ्या काही रसायनांमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

काय करायचं?

१. स्टील किंवा मातीची भांडी वापरा: शक्य तितके स्टील किंवा मातीच्या भांड्यांमध्ये चहा किंवा कॉफी प्या. ही भांडी सुरक्षित आणि पर्यावरणपूरक आहेत.

२. पेपर कपचा वापर कमी करा: जर तुम्हाला पेपर कप वापरायचे असतील तर गरम पेयांसाठी डिझाइन केलेले कप वापरा.

रोज ब्लॅक कॉफी पिण्याचे ७ फायदे

चहा की कॉफी हा वाद काही कधी संपणार नाही. चवीचं माहिती नाही, पण शरीरासाठी कॉफी चहापेक्षा नक्कीच चांगली असते. कॉफी पिण्याचे काही फायदे आहेत. पण आपण जसी कॉफी पितो तशी नाही. साधी ब्लॅक कॉफीच. ते ही योग्य प्रमाणात प्यायल्यास शरीरासाठी उपयुक्त ठरेल. अति कॉफी चांगली नाही. त्यात जर साखर घालत आहात किंवा क्रिम वापरत आहात तर, त्याचा शरीरासाठी काही उपयोग नाहीअशाने चांगले नाही तर वाईटच परिणाम होतील.

१. कॉफीमध्ये कॅफेन असते ज्यामुळे तरतरी येते. आळस दूर होतो. म्हणून जागरण करून काम करणारे लोक कॉफी पितात. शरीराच्या कार्यक्षमतेला कॅफेनमुळे उत्तेजन मिळते.

२. कॉफी वजन कमी करण्यासाठीही फायदेशीर ठरते. त्यामुळे ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनी चहाऐवजी कॉफी प्यायला सुरवात करा. रोज एक किंवा दोन कपच प्या. कॉफीचा अतिरेक नको.

३. रक्तामध्ये ऐड्रेनालाईन नामक एक रस असतो. जो हार्मोन, ताणतणाव तसेच रक्त प्रवाहाचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी मदत करतो. ऐड्रेनालाईनचे कार्य नीट चालावे यासाठी कॉफीचा फायदा होतो.

४. मधुमेहाचा धोका कॉफी प्यायल्याने कमी होतो. ज्यांना मधुमेहाचा त्रास आहे. त्यांच्यासाठी कॉफी हा एक चांगला पर्याय आहे. असे काही अभ्यासांमधून सिद्ध झाले आहे.

५. रेडक्लिफेबल.कॉम यांच्या मते कॉफी प्यायल्याने स्मरणशक्ती वाढते. गोष्टी विसरण्याची सवय असलेल्या लोकांनी कॉफी प्यावी. तसेच आकलन शक्ती ही कॉफीने वाढते. लक्ष केंद्रित करण्यासाठी कॉफी उपयुक्त असते.

६. लिव्हरचा त्रासही कॉफीमुळे कमी होतो. पोटासाठीही कॉफी चांगली असते. डोपामाइनची पातळी संतुलित ठेवण्यासाठी कॉफी उपयुक्त ठरते.

७. त्वचेसाठी कॉफी चांगली असते. म्हणूनच कॉफीपासून म्हणजेच कॅफेनपासून तयार केलेले अनेक प्रॉडक्ट बाजारात मिळतात. कॉफी पावडरचा वापर करून चेहऱ्यासाठी लेपही तयार करता येतो. कॉफीमध्ये पाणी घालून त्यात कोरफडीचा अर्क घालायचा. चेहर्यालसाठी स्क्रब म्हणून वापरायचा. नंतर कोमट पाण्याने धुवून टाकायचा. त्वचा स्वच्छ होते.

जास्त प्रमाणात पाणी पिणंही ठरू शकतं घातक

जाणून घ्या किती पाणी पिणं शरीरासाठी योग्य!



पाणी शरीरासाठी किती गरजेचं असतं हे सगळ्यांनाच माहीत आहे. पाण्याचं मदतीनं शरीरातील वेगवेगळी कामं करण्यास मदत मिळते. पाण्यानं शरीर हायड्रेट राहतं आणि अनेक प्रकारच्या आजारांपासून बचाव होतो. एक्सपर्ट दिवसभर भरपूर पाणी पिण्याचा सल्ला देत असतात. मात्र, प्रमाणापेक्षा जास्त पाणी पिणं आरोग्यासाठी नुकसानकारक ठरतं. जास्त पाणी प्यायल्यास ओवरहायड्रेशनची समस्या होते. ज्याला वॉटर इंटाक्सिकेशन असंही म्हणतात. जास्त पाणी प्यायल्यास किडनीवर दबाव पडतो आणि अनेक प्रकारच्या समस्या होतात.

पाणी पिण्याची योग्य पद्धत

पाणी नेहमीच योग्य पद्धतीनं प्यायला हवं. पाणी कधीच घाईघाईनं पिऊ नये. पाणी हळूहळू एक एक घोट प्यावं. जेणेकरून ते शरीरात ते अब्जॉर्ब व्हावं. खूप जास्त थंड किंवा गरम पाणी कधीच पिऊ नये. पाणी जेवण झाल्यावर नेहमी अर्ध्या तासांनंतर प्यावं. जेणेकरून पचनक्रिया चांगली व्हावी. जेवण केल्यावर लगेच पाणी प्यायल्यास पचनक्रिया स्लो होते. सकाळी उपाशीपोटी पाणी पिणं फायदेशीर असतं. असं केल्यास शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात.

काय काळजी घ्याल?

रोज तुम्ही योग्य प्रमाणात पाणी पित आहात याची काळजी घ्या. पण प्रमाणापेक्षा जास्त पाणी पिणं टाळलं पाहिजे. कारण यानं शरीरात सोडिअमचं संतुलन बिघडतं, ज्यामुळे हायपोनेट्रेमियाचा धोका वाढतो. पाण्याचं प्रमाणं प्रमाणा तुमच्या शरीराच्या गरजांनुसार बदलू शकतं. पण एकूणच काय तर दिवसभर भरपूर पाणी प्यावं.

पाणी पिण्याचं योग्य प्रमाण

सामान्यपणे एका हेल्दी व्यक्तीनं दिवसातून ८ ते १० ग्लास म्हणजे साधारण २ ते अडीच लीटर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पण हे प्रमाण तुमचं वय, वजन लिंग, फिजिकल ॲक्टिविटी आणि वातावरणावरही अवलंबून असतं. तुम्ही जास्त एक्सरसाईज करत असाल आणि तुमचा जास्त घाम जात असेल तर पाणी पिण्याचं प्रमाण वाढेल. जर तुम्ही आजारी असाल आणि औषधांचं सेवन करत असाल तर पाण्यात प्रमाणात बदल होऊ शकतो.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १६ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर २०२५

संपादकीय

खरे कोण? एक मंत्री की उर्वरित मंत्रिमंडळ?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



अजित पवार यांनी आयपीएस अंजना कृष्णा यांच्याशी केलेले संभाषण आणि छगन भुजबळ यांनी घेतलेली भूमिका आणि सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रपती-राज्यपाल विषयावरील सुनावणी हे सध्या चचेर्चे विषय आहेत. या तीनही विषयांचा एक समान धागा आहे, प्रत्येक पदाला असलेले संवैधानिक अधिकार.

सध्या तीन वेगवेगळ्या घडामोडी लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. त्याचा संबंध त्या त्या पदांना मिळालेल्या संवैधानिक आधाराशी असल्याने त्यावर चिंतन आवश्यक. एकीकडे सर्वोच्च न्यायालयात विधिमंडळाने संमत केलेल्या विधेयकांवर राष्ट्रपती, राज्यपालांनी किती कालावधीत निर्णय घेतला पाहिजे या विषयावर कायदेशीर किस पाडला जात आहे. तर महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अंजना कृष्णा यांच्याशी केलेले संभाषण आणि मराठा-ओबीसी या वादात छगन भुजबळ यांनी घेतलेली भूमिका हे चचेर्चे विषय आहेत.

या तीनही विषयांचा एक समान धागा आहे तो म्हणजे प्रत्येक पदाला असलेले संवैधानिक अधिकार. ते बजावताना कोण लक्ष्मणरेषा ओलांडते, हा विषय आहे. सर्वोच्च न्यायालयात कायदे व नियम यावर सखोल चिंतन सुरू आहेच. पण तिथे भाजप-प्रणित एनडीए व विरोधी इंडिया आघाडी वा इतर पक्षांची राज्य सरकारे वेगवेगळी भूमिका घेत आहेत. जनमताच्या पाठिंब्यावर चालणारे विधिमंडळ श्रेष्ठ की, त्यापेक्षा राष्ट्रपती व राज्यपाल श्रेष्ठ हा मुद्दा आहे. राज्यघटना श्रेष्ठ असेल, तर सत्तापक्ष वेगळे असल्याने भूमिका का बदलाव्यात, ही चिंतेची बाब आहे. राज्यघटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेले सर्वोच्च न्यायालय यावर अंतिम निवाडा देईल तेव्हा या मुद्द्यावर भाष्य होईल, अशी अपेक्षा ठेवायला हरकत नसावी.

इकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंजना कृष्णा यांच्याशी भ्रमणध्वनीवरून केलेले संभाषण हा विषय समाज माध्यमांद्वारे देशपातळीवर पोहोचला. राज्यघटनेने संसद व कार्यपालिका यांचे स्वतंत्र स्थान व स्वतंत्र अधिकार दिले आहेत. कार्यपालिकेने आपली जबाबदारी पार पाडताना सरकारच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. सरकार म्हणजे कोण तर मंत्रिमंडळ. मंत्र्यांनी व्यक्तिगत स्वरूपात दिलेले आदेश पाळावे की नाही, हे सर्वस्वी त्या अधिकाऱ्यावर अवलंबून आहे. तेच आदेश लेखी असतील, तर ते संवैधानिक चौकटीत बसणारे आहेत की नाही, हे तपासून काम करणे अपेक्षित आहे.

पण कालौघात सर्वांनीच आपापल्या मर्यादांचे उल्लंघन सुरू केले आणि चुकीचे पायंडे हेच नियम असल्याचा समज तयार झाला. मंत्री जरी राज्यकारभाराला जबाबदार असले तरी आपल्या खास कार्यकर्त्यांसाठी वा सामान्य माणसांसाठीही तोंडी आदेश द्यावेत का आणि त्याचे पालन अधिकाऱ्यांनी करावेच का, हा मुद्दा आहे. पण दुदैर्वाने मंत्री सांगतील ती प्रत्येक गोष्ट करायचीच व निष्कारण खप्पामर्जी ओढावून घ्यायची नाही, अशी पद्धत पडत गेली. त्यालाच अंजना कृष्णा छेद देतात. कार्यकर्त्याच्या फोनवरून उपमुख्यमंत्री बोलतात म्हणून त्यांचा आदेश पाळावा असे काही बंधन त्यांच्यावर नव्हते. माज्या मोबाईलवर फोन करा, असे त्यांनी सांगणे हे ही चूक नव्हते. पण असे ऐकून घेण्याची सवय नसल्याने उपमुख्यमंत्र्यांचा पारा चढला. याबाबत सरकारकडून स्पष्टीकरण आलेले नाही. आता मुख्यमंत्री अहवाल मागवणार आहेत आणि मग ते भाष्य करतील, अशी अपेक्षा.

ब्रिटिश काळातील भारतीय मुलकी सेवा (आयसीएस) हे मॉडेल आपण का स्वीकारायला हवे हा वाद झाला तेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्याचे जोरदार समर्थन केले. तेव्हा ते म्हणाले होते की, अधिकाऱ्यांनी आपली स्पष्ट मते नोंदवण्यास अजिबात कचरू नये. त्यांनी दिलेल्या मतांना डावलून जर मंत्रीमंडळाने निर्णय घेतलाच, तर मात्र त्याची उत्तम अंमलबजावणी करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. पटेल यांनी फाईलवर, प्रस्तावावर प्रशासनाने स्पष्ट मत नोंदवावे, असे सांगितले होते. आता ती पद्धत आहे का याची तपासणी करायचे ठरवले, तर अनेक वादग्रस्त ठरलेल्या निर्णयांच्या फायली पाहून सामान्यांना धक्का बसेल.

वरिष्ठ अधिकारी गपगुमान मंत्र्यांचे आदेश पाळू लागले, कनिष्ठांनी त्याचे अनुकरण सुरू केले व हा रिवाजच पडला. मला तोंडी आदेश देण्यापेक्षा लेखी द्या अथवा एखादा निर्णय चुकीचा वाटतो तो मंत्रीमंडळासमोर जाऊ द्या, असे कोणी म्हटले, तर तो कोणत्या ग्रहावरून आला आहे, अशा नजरेने त्याच्याकडे पाहिले जाईल. चुकीच्या पायंड्यांना नियम बनविल्याने आपण सामान्य जनतेप्रतीची बांधिलकी केव्हाच धुळीला मिळवली, हे वास्तव आहे.

विधिमंडळ, सरकार, प्रशासन यातील लोक लोकशाही व्यवस्था असलेल्या सार्वभौम प्रजासत्ताक देशाचे अधिकार वापरत असतात. ही व्यवस्था असलेला देश पारतंत्र्यातून सोडवाना अनेक ज्ञात-अज्ञातांनी स्वतःची, घरादाराची पर्वा केलेली नाही. अनेकांनी बलिदान दिलेले आहे. अनेकांच्या त्याग आणि समर्पणातून हा देश तयार झाला आहे. हे अधिकार देश व राज्यहितासाठी वापरले जावेत, असे अभिप्रेत आहे. आम्ही निवडून आलो म्हणून किंवा आम्ही प्रशासनात आलो म्हणून स्व-मजीर्ने किंवा स्वतःच्या आवडी-निवडीने हे अधिकार कसे काय वापरता येतील? आता दुसरा विषय आहे मंत्री छगन भुजबळ यांनी घेतलेल्या भुमिकेचा.

राज्य सरकारचा प्रत्येक आदेश, निर्णय ही मंत्रीमंडळाची सामुहिक भूमिका असते. त्यावर कोणाला वेगळी मते असतील तर त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत व्यक्त केली पाहिजेत. मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेण्यासाठी गेलेली मंत्री समिती ही मंत्रीमंडळाचे लघूरूप होती. त्यांनी जाहीरपणे दोन निर्णय जारी केल्याचे सांगितले. त्या विपरीत भूमिका दुसरे एक मंत्री छगन भुजबळ घेत आहेत. या विरोधात ह्लआपण न्यायालयात जाऊह्ल असे म्हणताहेत आणि सरकारलाच आव्हान देत आहेत. उर्वरित मंत्रिमंडळ मात्र आम्ही त्यांच्याशी चर्चा करू, समजूत काढू म्हणत आहे. यातून सरकार या व्यवस्थेबाबत लोकांमध्ये काय संदेश जात आहे? सरकारची भूमिका मान्य नसेल, तर मंत्र्यांनी आपल्या पदाचा त्याग करावा. ते करत नसतील, तर त्यांना तसे सांगितले गेले पाहिजे. पण इथे कोणताही नेता तसे बोलत नाही, कारण प्रत्येकाला मतपेढीची चिंता आहे. सरकारची लोकांमधील प्रतिमा हा विषय त्यांच्या गावीही दिसत नाही.

पूर्वी एखादा मंत्री आपल्या कर्तव्यात चुकत असेल व वेगळी भूमिका घेत असेल, तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागले आहेत. १९९२च्या सुमारास मुंबई उच्च न्यायालयातील वकील मंडळींनी एक आंदोलन सुरू करत हुतात्मा चौकात धरणे धरले. न्यायालयाचे कामकाज ठप्प झाले. त्यावरून बरीच खळबळ उडाली होती. हा गंभीर विषय हाताळण्याऐवजी तेव्हाचे विधी व न्याय मंत्री सुशीलकुमार शिंदे दौऱ्यावर निघून गेले. याची दखल घेत तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी त्यांचे खातेच काढून घेतले. शिंदे यांच्यासाठी हा मोठा धक्का होता.

२००१-०२मध्ये तत्कालीन कृषीमंत्री रणजीत देशमुख सातत्याने स्वतंत्र विदभार्ची भूमिका मांडत आणि जाहीरपणे सरकारच्या भूमिकेविरोधात मते व्यक्त करत. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची पंचाईत होत होती. एके दिवशी मंत्रिमंडळ पुनर्रचनेचा निर्णय घेत तेव्हा सांगली दौऱ्यावर असलेल्या रणजीत देशमुख यांना राजीनामा पाठवा, अशी सूचना केली गेली होती.

ही उदाहरणे यासाठी की कोण काय बोलावे, वागावे हा मुद्दा नाही. प्रश्न आहे मंत्री म्हणून जबाबदारीचा आणि संवैधानिक चौकटीचा. ती मान्यच नसेल, तर ह्यकायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा...ह्ल याला अर्थच राहणार नाही.

राजकीय सोय अन् ठाकरी बाणा



मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपने तर आशिष शेलार यांच्या जागी अमित साटम यांच्याकडे मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे तर एकनाथ शिंदे यांनी 21 पदाधिकार्यांची समिती तयार केली आहे. उद्धव ठाकरेंना मुंबईत पराभूत केले म्हणजे ठाकरेंची मुंबईतील ताकद संपेल आणि शिवसेना संपणार, असे साधे गणित आहे. तर मुंबई महापालिका पुन्हा जिंकायचीच, असा निर्धार ठाकरेंच्या शिवसेनेने केला आहे.

म्हणूनच मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. विशेष म्हणजे बुधवारी (10 सप्टेंबर) सव्वा दोन तास उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थवर राज ठाकरे यांच्याशी चर्चा केली. 20 वर्षांत दोन्ही भाऊ एकमेकांच्या घरी कधीही गेले नव्हते. मात्र, 5 जुलैपासून 10 सप्टेंबरपर्यंत उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंची चारवेळा जाहीर भेट झाली आहे. याचा अर्थ काय, हे वेगळे सांगण्याची कुणाला गरज नाही. राज ठाकरे आपल्यासोबत असावेत ही भाजपची इच्छा होती आणि आहे. मात्र, त्यांचे ठाकरी विचार भाजपला परवडत नाहीत. त्यामुळे राज ठाकरे यांना आपले म्हणत त्यांना भाजपने कायम दोन हात दूर ठेवले. म्हणजे किमान त्यांचा उपद्रव नको, एवढे अंतर ठेवले आहे. तर एकनाथ शिंदे यांनाही राज ठाकरे त्यांच्याकडे हवे आहेत. मात्र, माहीम विधानसभा निवडणुकीत ह्यराजह्लपुत्र अमित ठाकरे यांच्यासाठी एकनाथ शिंदे यांनी त्यांचा उमेदवार मागे घेतला नाही. त्यामुळे अमित ठाकरेंचा पराभव राज ठाकरेंच्या वर्मी लागला आहे. मात्र, यावर त्यांनी कधीही वक्तव्य केले नाही.

अखेर पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा सक्तीविरोधातील आंदोलनाच्या निमित्ताने दोन्ही भाऊ एकत्र आले. ते एकत्र येऊ नयेत म्हणून त्यांच्या जाहीर सभेआधीच सरकारने हिंदी सक्तीचे जीआर रद्द करण्याची हुशारी दाखवली खरी मात्र, उपयोग झाला नाही. कारण दोघेही एकत्र आले. एकदा नाही तर त्यानंतर तीनवेळा भेटलेही. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे मुंबई महापालिकेत ठाकरे बंधूंना रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि दोघेही सर्वांना पुरून उरत असल्याचे सध्याचे तरी चित्र आहे. एकनाथ शिंदे यांनी जून 2022 मध्ये बंडखोरी केली आणि शिवसेनेचे 40 आमदार फोडले. त्याचवर्षी उद्धव ठाकरे यांचे बंधू जयदेव ठाकरे यांनी शिवसेनेच्या दर्सया मेळाव्यात एकनाथ शिंदेंची भेट घेतली. उद्धव ठाकरे यांच्या वहिनी स्मिता ठाकरे यांनी मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन केले होते. तर उद्धव ठाकरे यांचे पुतणे निहार ठाकरे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले होते. एवढेच नाही तर बाळासाहेब ठाकरे यांचे मदतनीस चंपा सिंह थापा यांनीही शिंदेंना साथ दिली. तेव्हा ठाकरे कुटुंब आपल्यासोबत असल्याचा दावा एकनाथ शिंदेंकडून केला जात होता.

आज एकनाथ शिंदे यांच्यासोबत असलेले हे ठाकरे कुठे आहेत, याचा कुणालाच पत्ता नाही. मात्र, उद्धव ठाकरे यांना मुंबईत पराभूत करायचे असेल राज ठाकरे आपल्याकडे हवेत, याची सर्वांना जाणीव आहे. म्हणूनच त्यांना आपल्याकडे वळवण्याचे सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. यावरून खरे ठाकरे कोण, याची जाणीव एकनाथ शिंदे यांना झाली आहे, यात खूप काही आले. आजही ठाकरेंचा शब्द चालतो, त्यांना मानणारे बहुसंख्य लोक आहेत, याचा विसर भाजपला अजिबात झालेला नाही. म्हणूनच उद्धव ठाकरेंना कोंडीत पकडण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. त्यासाठी राज ठाकरेंना भाजपकडे खेचण्याचे हरर्तहेने प्रयत्न झाले. मात्र, राज ठाकरे कुणालाही बधले नाहीत. मैत्री वेगळी आणि राजकारण वेगळे यातील स्पष्ट रेष त्यांनी ओळखली. म्हणूनच राज ठाकरे त्यांचा आब राखून आहेत. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच मंत्र्यांना शिवतीर्थावर यावे लागते, यातून राज ठाकरेंचे राजकीय महत्त्व अधोरेखित होते. आता हे दोन्ही बंधू एकत्र असल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासाला तडा लावण्यासाठी शिवसेना तसेच भाजपकडून प्रयत्न सुरू आहेत.

दोन्ही भाऊ एकत्र आल्याने आम्हाला काहीही फरक पडत नसल्याचे वारंवार सांगत आहेत. याचाच राजकीय अर्थ फरक पडतो, असा होतो. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील बहुसंख्य माजी नगरसेवकांना एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पंखाखाली घेतले आहे. भाजपनेही त्यांची ताकद वाढवली आहे. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना अडचणीत आली आहे. अनेक आमदार, खासदार, नगरसेवक, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे. तर राज ठाकरे यांचा एकही आमदार नाही किंवा त्यांची एकाही पालिकेवर सत्ता नाही. त्यामुळे दोघे एकत्र आल्यास दोघांच्या पक्षांना मोठा आधार मिळेल, असा विचार त्यांनी केला असेल तर त्यात वावगे काय? दोन्ही नेत्यांनी एकमेकांची राजकीय सोय पाहिली आहे. मनसे आणि ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही स्थानिक राजकीय पक्ष आहेत. भाजपचे प्राबल्य असलेल्या राज्यात दोन्ही पक्ष वाढावेत असे वाटत असेल तर दोघांनी एकत्र येण्याची आणि एकत्र राहण्याची गरज आहे.

आणखी एका शेजाऱ्याच्या घरात...



शेजारच्या घरात आग लागते, त्याची धग आपल्यापर्यंत येते; त्यामुळे नेहमी काळजी घ्यावी, असं म्हटलं जातं. देशाच्या पातळीवर विचार केला, तर भारताच्या शेजारी असलेल्या मित्र राष्ट्रांमध्ये ज्या घडामोडी वेगाने घडत आहेत, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. गेली अनेक दशके शांत असलेला नेपाळ अलीकडच्या काळात अस्थितरतेच्या गर्तेत का सापडला आहे? याची कारणं त्यासाठी शोधावी लागतील. मंत्र्यांना आंदोलकांनी घरात घुसून सळो की पळो करून सोडलं, नेपाळच्या राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांना २४ तासांत राजीनामा द्यावा लागेल, हे दोन दिवसांपूर्वी कोणाच्या स्वप्नात आले नसेल. पण, ते प्रत्यक्ष घडलं. पशुपतीनाथाच्या भूमीत जनतेचे तांडवरूपी रौद्ररूप पाहून सत्तेच्या सिंहासनावर बसलेल्यांना पायउतार व्हावं लागलं. नेपाळ सरकारने नुकतेच एक नवीन विधेयक संसदेमध्ये आणलं होतं, ज्यात परदेशात चालविणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना स्थानिक प्रतिनिधी नियुक्त करणं हे बंधनकारक केलं होतं. त्यानंतर, ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्याचा सरकारचा आक्षेप होता. नेपाळ सरकारने जर सोशल मीडिया ॲपवर बंदी घातली, ती सर्व अमेरिका आणि युरोपमधील असल्याने चीनमध्ये त्यावर आधीपासूनच बंदी आहे. चीनने पाश्चात्य देशांची विचारसरणी रोखण्यासाठी स्वतःचे ॲप विकसित केले आहेत. नेपाळमध्येही त्याच धर्तीवर प्रयत्न सुरू केले गेले. दुसरीकडे चिनी ॲप्सवर का बंदी घालण्यात आली नव्हती, याचंही नेपाळी जनतेला आश्चर्य वाटत होतं. नेपाळमधील युवावर्गामध्ये नेपाळ सरकारच्या या निर्णयाने प्रचंड संतापाची लाट उसळली. राजधानी काठमांडूसह देशभरात निदर्शनं उसळली. संतप्त तरुणांनी काठमांडूच्या नवीन बाणेश्वर संसद संकुलात घुसखोरी केली. पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून त्यांनी संसदेच्या आवारात घुसखोरी केली, ज्यामुळे तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान शेर बहादूर देऊबा यांच्या बुढानिलकांठा येथील निवासस्थानाचीही निदर्शकांनी तोडफोड केली. हिंसक जमावापुढे सरकारला नांगी टाकावी लागली.

नेपाळमध्ये तरुणाईला जेन-झी नावाने संबोधलं जातं. सोशल मीडियावरील बंदीनंतर हा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेला दिसला. सरकारने मोठ्या खुबीने सुप्रीम कोटार्ची ढाल पुढे करून बंदीचा आदेश आणल्याने युवा वर्गाने सुरुवातीला शांततापूर्ण आंदोलनांची शपथ घेतली.

पण, पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि पाण्याच्या तोफांचा वापर सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. डिजिटल जगाशी जोडली गेलेली लाइफलाइन कापली गेल्याने अस्वस्थ झालेला तरुण कसा हिंसक बनतो, याचं या निमित्ताने उदाहरण जगासमोर आलं. केवळ नेपाळमधीलच नव्हे; जगभरातील तरुण पिढी सोशल मीडियाच्या प्रभावाखाली आहे हे यातून दिसून आलं. मांजरीला घरात कोंडून ठेवलं तर ती नरडीचा घोट घेते. आज तरुण पिढीचं तसंच झालं आहे. सोशल मीडियाचा वापर हा तरुणाईच्या जगण्याचा एक भाग बनला असल्याने, अन्य देशात जर अशा बंदीचा निर्णय झाला, तर तिथेही नेपाळसारखी स्थिती उद्भवू शकते, हा इशारा यातून मिळाला आहे.

नेपाळमधील आंदोलनात २१ तरुणांचा बळी गेला आहे. सरकारने सोशल मीडियावरील बंदीचा निर्णय मागे घेण्याची घोषणा केल्यानंतरही आंदोलक शांत झाले नाहीत. आंदोलकांनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचं निवासस्थान पेटवून दिलं. विशेष म्हणजे, आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये पंतप्रधान ओली यांच्या राजीनाम्याची मागणी होती. २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात नेपाळमध्ये झालेल्या निवडणुका या शेवटच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या; नेपाळ काँग्रेस (एनसी) हा सर्वांत मोठा पक्ष ठरला असला, तरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओवादी सेंटर (सीपीएन-एमसी)ने कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-युनिफाइड-मार्क्सिस्ट लेनिनिस्ट (सीपीएन-यूएमएल)शी युती करून सरकार स्थापन केलं. त्यानंतर राजकीय डावपेचातून चार वेळा सत्तापालट झाला आणि २०२४ च्या जुलै महिन्यात सीपीएन-यूएमएल व एनसी या पक्षांनी संधान बांधून सरकार स्थापन केले. के. पी. शर्मा ओली पंतप्रधान पदावर आले. पक्षांच्या जोड्या बदलत राहिल्या, तरी मूळ समस्या तशाच होत्या. प्रशासनासंबंधात एकमत नसणं, एकाच व्यक्तीने एकतर्फी निर्णय घेणं आणि आपल्याला निर्णयप्रक्रियेतून बाहेर ठेवलं जात असल्याची कनिष्ठ पक्षाला भीती वाटणं या बाबी सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांमध्ये दिसून येत होत्या. या आंदोलनात सहभागी असलेल्या तरुणांनी केवळ सोशल मीडिया बंदीलाच विरोध केला नाही, तर देशात वाढलेल्या भ्रष्टाचाराविरोधातही संताप व्यक्त केला आहे. हुकूमशाही वृत्तीच्या विरोधात रस्त्यावर आल्याचे विद्यार्थ्यांचं म्हणण आहे.

भारत आणि नेपाळ या दोन देशांतील संबंध भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक समानतेवर आधारित आहेत. १९५० च्या शांती आणि मैत्री कराराने दोन देश जोडले गेले आहेत. या दोन देशांत रोटीबेटी संबंधांबरोबर भाषिक साम्यही आहे. भारताने आतापर्यंत नेपाळच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदानही दिलं आहे. हिंदूंची मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून ओळख असली तरी बुद्धांचं जन्मस्थान असलेलं लुंबिनी हे स्थान नेपाळमध्ये असल्याने जगभरातील बौद्धधर्मीयांना नेपाळविषयी प्रचंड आस्था आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बांगलादेश, श्रीलंका, मालदिवसह भारताच्या सीमेवरील देशात अस्थिरता आणि घुसखोरीचा प्रयत्न चीनी भाईकडून सातत्याने सुरू आहे. नेपाळमधील यादवीला तेच कारणीभूत असावेत, असा सूर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटतो आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार,१६ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर २०२५

वाढवण बंदर राज्यातील सर्व प्रमुख ठिकाणशी जोडणार



मुंबई। महाराष्ट्र हे देशातील एक उद्योग स्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे सर्वोत्तम आहे. राज्यातील सर्व महत्वाची ठिकाणे वाढवण बंदराशी जोडण्यात येणार असून तसेच इज ऑफ राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जियो वॉर्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया ऑस्ट्रेलिया फोरमच्या ग्लोबल लीडर मीट या राऊंड टेबल कॉन्फरन्स वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नेहमीच तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन आणि परिपूर्ण धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राची समावेश आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सेवा क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या साठी मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. ही एक खिडकी योजना असून उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करताना चांगला अनुभव यावा यासाठी प्रयत्नशील असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इज ऑफ ड्यूइंग बिसनेस मध्ये नव्याने सुधारणा करण्यात येत आहेत. गुंतवणुकीच्या नवीन संकल्पना राबवण्यात येत आहेत. राज्यात एक्सप्रेस वे चे जाळे उभारले जात आहे. वाढवण बंदरामुळे राज्य सागरी व्यापार क्षेत्रात महत्वाचा भागीदार असणार आहे.

संपूर्ण राज्यातील महत्त्वाची ठिकाणे सहा तासाच्या अंतराने वाढवण बंदराशी जोडली जात आहेत. राज्यात सांडपाणी व्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. त्याचा ऑस्ट्रेलियातील उद्योगांनी फायदा घ्यावा. या क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्यात येत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या विकासाला आणखी गती मिळेल. पुण्यात जलद वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांचे नवनवीन प्रकल्प उभारण्यात येत आहेत. शासन उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक निर्णय घेत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या राऊंड टेबल कॉन्फरन्स पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी निमंत्रित व उद्योगांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, ऑस्ट्रेलिया हा शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य देश आहे. अनेक भारतीय विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी जातात. आता ते शिक्षण नवी मुंबई येथील एज्यू सिटी मध्ये मिळणार आहे. तसेच गोंडवाना विद्यापीठाशी कुर्निल विद्यापीठाने केलेल्या करारामुळे खाणकाम क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे शिक्षण उपलब्ध होऊन त्याचा फायदा गडचिरोली जिल्ह्यातील लोह उद्योगाला होईल.

मुंबईत पुन्हा बॉम्बस्फोटाची धमकी, पोलीस सतर्क



मुंबई। मुंबईत पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली आहे. अज्ञात व्यक्तीने दूरध्वनी करून मुंबईलगतच्या समुद्रात बॉम्बस्फोट होणार असल्याचा इशारा दिला. नवी मुंबईतील महापे येथील आपत्कालीन हेल्पलाइन ११२ वर याबाबतचा दूरध्वनी आला होता. त्यानंतर याबाबतची माहिती मुंबई पोलसांना कळवण्यात आली. त्यानंतर संबंधित यंत्रणांना सतर्क करण्यात आले होते. धमकीचा दूरध्वनी आल्यानंतर लगेचच मुंबई पोलीस सतर्क झाले असून, समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. दूरध्वनी करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपासासह सखोल चौकशी सुरू केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा दूरध्वनी नेमका कुठून आला, तसेच तो कोणी केला त्याची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

प्राथमिक तपासणीत माहिती तथ्य नसल्याचे आढळले आहे. त्यामुळे याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, या प्रकरणाकडे गुप्तचर विभाग व दहशतवादविरोधी पथकही (एटीए) गांभीर्याने पाहत असून संबंधित सर्व यंत्रणांना सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. तसेच नौदलालाही याबाबतची माहिती देण्यात आली आहे. मुंबईत यापूर्वीही विविध ठिकाणी बॉम्बस्फोटाच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. त्यापैकी काही खोट्या ठरल्या, तर काही वेळा सुरक्षा व्यवस्था वाढवावी लागली होती. मात्र त्यानंतर पोलिसांना प्रत्येक धमकीची, तसेच माहितीची दखल घ्यावी लागते.

ग्राहक बनून पोलीसच मॉलमध्ये आले; उल्लूची अभिनेत्री चालवायची सेक्स रॅकेट

मुंबई। शहरातील मीरा रोडजवळील काशीमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी छापा टाकून वेश्याव्यवसाय रॅकेटचा भांडाफोड केला आहे. त्यात 41 वर्षीय अभिनेत्री अनुष्का मोनी मोहन दास हिला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत दोन टेलिव्हिजन मालिकांमधील तसेच बंगाली सिनेमातील महिला कलाकारांची सुटका करण्यात आली आहे. विशेष म्हणजे अटक करण्यात आलेली अभिनेत्र ही बंद करण्यात आलेल्या उल्लू ॲपमधील कलाकार असल्याचीही माहिती समोर आली आहे. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच उल्लू, अल्ट बालाजीसह अश्लील कंटेट प्रसारित करणाऱ्या 10 ॲपवर कारवाई करत हे ॲप भारतात बंद केले आहेत. त्यामुळे, या ॲपमधील मालिकांसाठी काम करणाऱ्या कलाकारांची मोठी कोंडी झाली आहे. काशीमीरा पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर त्यांनी दोन बनावट ग्राहक तयार केले. आरोपींनी ग्राहकांना मुंबई-अहमदाबाद महामार्गालगतच्या काशीमिरा येथील एका मॉलमध्ये बोलावले होते. पोलिसांनी रंगेहात सापळा रचत आरोपींना पैसे स्वीकारताना पकडले आणि त्यांना ताब्यात घेतले. अटकेत आलेली अभिनेत्री अनुष्का मोनी मोहन दास (वय 41) असं नाव आहे, तर पोलिसांनी सुटका केलेल्या दोन महिला कलाकार, ज्यांनी टीव्ही मालिकांमध्ये तसेच बंगाली चित्रपटांत भूमिका साकारल्या आहेत. त्यांना ताब्यात घेऊन आश्रयगृहात हलवण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय दंड संहिता कलम 370(3) (मानव तस्करीसंबंधी) आणि अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणांमधील वाढत्या आत्महत्या एक गंभीर संकट!



मुंबई। मुंबई :दिवसेंदिवस आत्महत्यांची सावली समाजावर अधिक गडद होत चालली आहे. मानसिक ताण, आर्थिक संकट आणि सामाजिक दबाव या त्रिसूत्रीने आत्महत्यांचे प्रमाण भयावह पातळीवर पोहोचले आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार दर ४० सेकंदाला जगात कुणीतरी आपले जीवन संपवत आहे. आत्महत्या ही फक्त वैयक्तिक शोकांतिका नसून समाजासाठी गंभीर आव्हान ठरली आहे. भारतात तर दररोज जवळपास ४७० जणांचा मृत्यू आत्महत्येमुळे होतो. या भीषण पार्श्वभूमीवर १० सप्टेंबरला पाळला जाणारा ह्याजागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनह्न समाज खऱ्या अर्थाने जागरुक बनून आत्महत्यांची मानसिकता असणाऱ्यांना मदतीचा हात पुढे करणार का,हा कळीचा प्रश्न बनला आहे. जीवनाची लढाई हरण्यापूर्वी कोणीतरी मदतीचा हात पुढे केला असता तर अनेक जीव वाचले असते. दुर्दैवाने त्यांची वेदनादायी हाक ऐकून मदतीला धावण्याची समाजाची मानसिकता हरवत चालल्यामुळे या आत्महत्या एक मूक महामारी बनू लागली आहे. रोज सकाळी उठून ज्या कुटुंबाला आपल्या प्रियजनाच्या निधनाची बातमी कळते त्यांच्या घराचे जगणेच थांबते. दुर्दैवाने अशा घरांची संख्या भारतात दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभर ह्याजागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनह्न म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने मानसिक आरोग्य, सामाजिक जबाबदारी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबद्दल चर्चा सुरू होते. मात्र जागतिक व भारतीय आकडेवारी पाहिली तर ही चर्चा केवळ औपचारिक न राहता यावर ठोस कार्यक्रम रबविण्याची गरज असल्याचे दिसून येते.जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२३ च्या अहवालानुसार दरवर्षी जगभरात सुमारे ७ लाखांहून अधिक लोक आत्महत्या करतात. म्हणजेच प्रत्येक ४० सेकंदाला एक जण आपले जीवन संपवतो. आत्महत्या ही १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींमध्ये मृत्यूचे चौथे सर्वाधिक कारण असल्याचे जागतिक आरोग्य संघटने स्पष्ट केले आहे. भारताची परिस्थिती आणखी गंभीर आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदवही ब्युरोच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारतात एका वर्षात १,७०,९२४ लोकांनी आत्महत्या केली. म्हणजेच दररोज जवळपास ४६९ जणांनी स्वतःचे जीवन संपवले. आत्महत्यांचे प्रमाण २०२२ च्या तुलनेत ३ टक्यांनी वाढले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण धोकादायकरीत्या वाढलेले दिसून येते. २०२३ मध्ये देशभरात १३,०८९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, जे मागील दहा वर्षांतील सर्वाधिक आहे.

जेवणाच्या वादाचा हादरवणारा शेवट, 5 मित्रांनी असा कांड रचला की त्याला आयुष्यातून उठवलं

मुंबई। राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसत आहेत. मुंबईत असाच एक धक्कादायक प्रकार घडला आहे. एका बार अँड रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेलेल्या व्यक्तीचा वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की त्याने आपल्या 4 मित्रांना तेथे बोलावून घेतले. त्या व्यक्तीचे चारही मित्र तातडीने तेथे पोहोचले. त्यांनी पाच जणांनी मिळून वाद झालेल्या व्यक्तीला लाथा बुक्क्या घातल्या. दरम्यान, त्या व्यक्तीचा मृत्यू झाला. नेमकं काय घडलं? मुंबईतील मालाड पश्चिम येथील चिंचोली बंदर परिसरात ही घटना घडली आहे. तेथील गुरुकृपा बार अँड रेस्टॉरंटमध्ये जेवणावरून संजय मकवाना आणि कल्पेश भानुशालीशी यांच्यामध्ये वाद झाला. संजयला राग अनावर झाला. त्याने कल्पेशला धडा शिकवण्यासाठी चार मित्रांना फोन लावून तेथे बोलावून घेतले. संजय आणि त्याच्या पाच मित्रांनी लाथा आणि शस्त्रांनी कल्पेश भानुशालीवर हल्ला केला. संजयच्या मित्रांनी कल्पेशला धडा शिकवण्यासाठी डोक्यात बिअरच्या बाटल्या फोडल्या. त्यामुळे कल्पेश गंभीर जखमी झाला. ही घटना पहाटे ३ वाजता घडली. कल्पेशला स्थानिकांच्या मदतीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी कल्पेश भानुशालीला मृत घोषित केले. या हत्याकांडातील एका आरोपीला मालाड पोलिसांनी अटक केली आहे. तर बाकीचे चार आरोपी फरार आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. कल्पेशचा भाऊ परेश भानुशालीने, ह्यजर गुरुकृपा बार अँड रेस्टॉरंट इतक्या उशिरापर्यंत उघडले नसते तर माज्या भावाचा जीव वाचला असता. जेवणाच्या कारणावरून हा वाद झाला आणि संजय मकवाना यांनी त्याच्या मित्रांसह माज्या भावाला लाथा मारून आणि बिअरच्या बाटलीने आणि धारदार शस्त्राने हल्ला करून ठार मारले.

माणूसकी धाब्यावर बसवली आहे का? उच्च न्यायालयाच्या संतापाचे कारण काय?



मुंबई। शहरी नक्षलवाद प्रकरणात अटकेत असलेले कबीर कला मंचचे रमेश गायचोर यांना आजारी वडिलांना भेटण्यासाठी तात्पुरता जामीन मंजूर केला असतानाही त्यांची कारागृहातून सुटका केली नाही, यावरून उच्च न्यायालयाने बुधवारी कारागृह प्रशासनाला धारेवर धरले. तसेच, तुम्ही माणूसकी धाब्यावर बसवली आहे का ?, असा संतप्त प्रश्नही न्यायालयाने केला.

न्यायालयाने केवळ मानवतेच्या दृष्टिकोनातून गायचोर यांना तात्पुरता जामीन मंजूर केला होता. असे असताना कारागृह प्रशासनाने माणूसकी सोडली आहे का ? हे सर्व फक्त याचिककत्यार्ला त्रास देण्यासाठी करत आहात का ? तुम्ही न्यायालयाच्या आदेशांचे पालन का केले नाही ? अधीक्षक कुठून आले आणि दंडाधिकारी सुटकेचे वॉरंट मागतातच कसे ? अशी प्रश्नांची सरबत्तीच न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने सरकारी वकिलांवर केली. त्यावर, उच्च न्यायालयाच्या सर्व आदेशांचे राज्य सरकार काटेकोरपणे पालन करते. या प्रकरणात, याचिककत्यार्ला तात्पुरता जामीन मंजूर करण्याबाबत अधीक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता.

उच्च न्यायालयात अपिलात जामीन मिळवणाऱ्या आरोपीला न्यायदंडाधिकाऱ्याने सुटकेचे वॉरंट बजावणे आवश्यक असते, त्यानंतरच अर्जदाराला सोडले जाते, असा दावा सरकारी वकिल मनकुंवर देशमुख यांनी केला. त्यावरही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात, गायचोर यांना तात्पुरता जामीन देण्यात आला होता.

दुसरीकडे, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्याच्या कलम २१ अंतर्गत हा आदेश दिला गेला होता, त्यामुळे, फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम ३८८ अंतर्गत सुटकेच्या वॉरंटची आवश्यकता नसल्याचेही न्यायालयाने सरकारी वकिलांना आठवण करून देताना नमूद केले. तत्पूर्वी, पंच्याहत्तर वर्षांच्या वडिलांची प्रकृती बिघडली असून त्यांना पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

तळोजा कारागृह अधीक्षकांचा उच्च न्यायालयात माफीनामा



मुंबई। शहरी नक्षलवाद प्रकरणात अटकेत असलेले कबीर कला मंचचे रमेश गायचोर यांची आजारी वडिलांना भेटण्यासाठी तात्पुरत्या जामिनावर सुटका करण्यात आल्याची माहिती तळोजा कारागृह प्रशासनातर्फे गुरूवारी उच्च न्यायालयात देण्यात आली. त्याचवेळी, न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीस झालेल्या विलंबाबाबत कारागृह अधीक्षकांनी न्यायालयात माफीनामा सादर केला. गायचोर यांना तात्पुरता जामीन मंजूर केलेला असतानाही त्यांची कारागृहातून सुटका न केल्यावरून न्यायालयाने बुधवारी कारागृह प्रशासनाला धारेवर धरले होते. तसेच, तुम्ही माणुसकी धाब्यावर बसवली आहे का ? असा संतप्त प्रश्नही केला होता. त्यानंतर, सरकारी वकिलांनी न्यायालयाची माफी मागितली होती आणि अधिकाऱ्याचा माफीनामा विहित असलेले प्रतिज्ञापत्र गुरुवारी सकाळी न्यायालयात सादर करण्यात येईल, असे आश्वासनही दिले होते.

त्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठापुढे गुरूवारी सुनावणी झाली. त्यावेळी, गायचोर यांची बुधवारी रात्री कारागृहातून सुटका करण्यात आल्याची माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली. तसेच, न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी झालेल्या विलंबाबाबत माफी मागणारे कारागृह अधीक्षकांचे प्रतिज्ञापत्रही दाखल केले. ते स्वीकारून न्यायालयाने आपल्या आधीच्या आदेशात बदल केला आणि गायचोर यांना १३ सप्टेंबरपर्यंत तात्पुरता जामीन मंजूर केला. दरम्यान, बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने कारागृह प्रशासनाला धारेवर धरताना, आम्ही केवळ मानवतेच्या दृष्टिकोनातून गायचोर यांना तात्पुरता जामीन मंजूर केला होता. असे असताना कारागृह प्रशासनाने माणूसकी सोडली आहे का ?

हे सर्व फक्त याचिककत्यार्ला त्रास देण्यासाठी करत आहात का ? तुम्ही न्यायालयाच्या आदेशांचे पालन का केले नाही ? अधीक्षक कुठून आले आणि दंडाधिकारी सुटकेचे वॉरंट मागतातच कसे ? अशी प्रश्नांची सरबत्तीच खंडपीठाने सरकारी वकिलांवर केली होती. त्यावर, उच्च न्यायालयाच्या सर्व आदेशांचे राज्य सरकार काटेकोरपणे पालन करते. या प्रकरणात, याचिककत्यार्ला तात्पुरता जामीन मंजूर करण्याबाबत अधीक्षकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता.

प्रियकरासाठी महिलेने केली स्वत:च्या घरात चोरी... मुलीच्या प्रियकरावर ठेवला डोळा



मुंबई। समाज माध्यमावर भेटलेल्या प्रियकरासोबत पळून जाण्यासाठी एका विवाहित महिलेने स्वतःच्याच घरात चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. मात्र हा प्रियकर भामटा निघाला आणि या महिलेची १० लाखांची फसणूक झाली. दुसरीकडे चोरीचे बिंग फुटल्याने महिलेला पोलिसांनी अटक केली. या महिलेचे स्वतःच्या मुलीच्या प्रियकराशीही संबंध असल्याचे उघड झाले. गोरेगाव पूर्व येथील संतोष नगर परिसरात एक पालिका कर्मचारी पत्नी आणि मुलीसह राहतो. त्यांच्या घरात २८ ऑगस्ट रोजी चोरी झाली. अज्ञात चोराने घरातील १० तोळ्यांचे सोन्याचे दागिने लंपास केले. याबाबत दिंडोशी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास केला असता घरात चोरी झाल्याच्या कुठल्याही खाणाखुणा नव्हता. परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रण तपासले असता काहीच संशयास्पद आढळले नाही. दरवाजा तोडलेला नव्हता की खिडकीतून कुणी प्रवेश करणे शक्य नव्हते. यानंतर तक्रारदाराच्या ४२ वर्षीय पत्नीनेच ही चोरी पतीने केल्याचा संशय व्यक्त केला. दिंडोशी पोलिसांनी या रहस्यमय चोरीच तपास सुरू केला. पतीची सखोल चौकशी केली तेव्हा त्यांच्यातील नातेसंबधात कटुता असल्याचे आढळले. त्यामुळे पोलिसांनी तपासाची दिशा बदलली. त्यांनी पत्नीच्या मोबाइलचे तपशील मिळवले.

गणेशोत्सव काळात एसटीला विक्रमी उत्पन्न

पालघर। गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी महामंडळाने विशेष बससेवा पुरवून यशस्वीपणे वाहतूक केली आहे. पालघर एसटी विभागाच्या माध्यमातून कोकणाकडे आणि परतीसाठी एकूण ७०६ विशेष बसगाड्या सोडण्यात आल्या. ज्यामुळे तब्बल ३१,५४६ प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला. या विशेष नियोजनामुळे एसटी महामंडळाला सुमारे १ कोटी ८० लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले आहे. गणेशोत्सव आणि गौरी उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची सोय लक्षात घेऊन, पालघर एसटी विभागाकडून विशेष बससेवांचे नियोजन करण्यात आले होते. २३ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या कालावधीत कोकणाकडे जाणाऱ्या बसगाड्यांची गर्दी लक्षात घेता, विभागाकडून ६५५ बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये पालघर विभागाच्या स्वतःच्या १४२ बसेससह इतर विभागांकडूनही अतिरिक्त बसेस मागवण्यात आल्या होत्या. यामध्ये नागपूर प्रदेशातून १५०, अमरावती प्रदेशातून १७३ आणि रत्न गिरी विभागातून ९९ बसेसचा समावेश होता.या बसेस विरार, मानवेल पाडा, नालासोपारा, नवघर आणि वसई अनाळा येथून सोडण्यात आल्या, ज्यामुळे प्रवाशांची सोय झाली.

श्वानाला मारले, मालकाचे दोन दात पाडले; वांद्यातील घटना, हल्लेखोराला अटक



मुंबई। फिरायला घेऊन गेलेल्या श्वानाला त्रास दिल्याबद्दल जाब विचारणाऱ्या वृद्ध व्यक्तीवर हल्ला करण्यात आल्याची घटना वांद्रे पश्चिम परिसरात घडली. या हल्ल्यात वृध्दाचे दोन दात पडले असून दुखापत झाली आहे. घटनास्थळावरील नागरिकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. हल्ला करणाऱ्याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्वान प्राणीप्रेमींचा आवडता प्राणी. अनेक जण श्वान पाळतात. एकीकडे भटक्या श्वानांचा उपद्रव वाढत असताना असे पाळीव श्वान मात्र लाडात असतात. परंतु अनेकांना श्वानप्रेमींचा त्रास होत आहे. पाळीव श्वान रस्त्यात घाण करतात, अंगावर भुंकतात असा समज त्यांचा असतो. त्यातून वादविवाद होतात. तक्रादार नील डिमेंटो (६०) वांद्रे पश्चिम येथील २४ व्या रस्त्यावर राहतात. ते ९ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आपल्या श्वानाला घेऊन फिरण्यासाठी निघाले होते. त्यावेळी एका तरूणाने त्यांना हटकले आणि तो श्वानाची छेडछाड करू लागला. माज्या श्वानाला का त्रास देतो अशी विचारणा करीत पिमेंटो यांनी त्याला विरोध केला.

लोखंडी सळईने मारहाण

श्वानाला त्रास देणाऱ्या व्यक्तीच्या हातात लोखंडी सळई होती. त्याने त्या लोखंडी सळईने डिमेंटो यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात डिमेंटो यांचे दोन दात तुटले. हा प्रकार पाहून रस्त्यावरून जाणारी एक व्यक्ती पिमेंटो यांच्या मदतीला आली. त्याने हल्ला करणाऱ्या आरोपीला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. जखमी डिमेंटो यांच्यावर भाभा रुग्णालयात उपचार करण्यात आले. आरोपी फईम काझी (२०) भंगार विक्रेता आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com